अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

वर्ष : २४ वे ▸ अंक : १२२ वा ▸ किंमत : ५ रुपये ▸ पाने १२

www.surajyadigital.com । शुक्रवार, दि. ३० जानेवारी २०२६ ।



# केंद्रात सुप्रियाताई राज्यात सुनेत्राताई

# अजितदादांची Exit, वारसाचे Predict

✔ मुंबई/प्रतिनिधी

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार हे अनंतात विलीन झाले आहेत. परंतु त्यांच्या निधनानंतर आता त्यांचा राजकीय वारसदार कोण असा प्रश्न विचारला जात आहे. त्यासंबंधी पडद्यामागे राजकीय हालचालीही सुरू झाल्या आहेत. त्यातच आता सुनेत्रा पवारांनाच उपमुख्यमंत्री करा, अशी एक मागणी जोर धरताना दिसत आहे. राज्यसभेवर असलेल्या सुनेत्रा पवार यांना पक्षाच्या हंगामी अध्यक्ष करावे आणि त्यांनी बारामती विधानसभेची पोटनिवडणूकही लढवावी अशी मागणी केली जात असल्याची माहिती समोर आली आहे. अजित पवारांच्या अकाली निधनामुळे राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये मोठी पोकळी निर्माण झाल्याचं चित्र आहे. दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येण्याची जोरदार चर्चा सुरू असताना, तशी पावलंही पडत असताना अजित पवारांचे निधन झाले. त्यामुळे आता त्यांचा राजकीय वारसदार कोण याची चर्चा सुरू झाल्याचं दिसतंय. राष्ट्रवादीचे नेते प्रफुल पटेल आणि छगन भुजबळ यांनी सुनेत्रा पवारांची भेट घेतली आणि त्यांच्याशी चर्चा केली. तर नरहरी झिरवाळांनी सुनेत्रा पवार यांनाच उपमुख्यमंत्री करा अशी मागणी केली. त्यामुळे सुनेत्रा पवार यांना राष्ट्रवादीचे हंगामी अध्यक्ष केलं जाण्याची शक्यता असल्याची चर्चा सुरू आहे.

## राष्ट्रवादीमध्ये अंतर्गत चर्चा सुरू

अजितदादांकडे अर्थ खात्यासारखं महत्त्वाचं खातं होतं. त्यामुळे त्यांच्याकडील खाती कुणाकडे द्यावीत यासाठी राष्ट्रवादीच्या ज्येष्ठ नेत्यांमध्ये महत्वाची चर्चा सुरू असल्याची माहिती आहे. त्यानुसार दादांकडे असलेली खाती कुणाला देण्यात यावीत त्याची नावं मुख्यमंत्र्यांना देण्यात येणार असल्याची माहिती आहे. पक्षाच्या ज्येष्ठ मंत्र्यांकडे ही खाती राहण्याची शक्यता आहे. त्याचसोबत एखाद्या आमदाराकडे ही खाती देऊन त्याला मंत्रिपदी घेता येतं का यासाठीही चाचपणी सुरू असल्याची माहिती आहे.

## राज्यात सुनेत्रा, केंद्रात सुप्रिया, शरद पवारांनी 'एनडीए'मध्ये यावं | अजितदादांच्या निधनानंतर केंद्रीय मंत्र्याची पहिली ऑफर

उपमुख्यमंत्री अजित पवार यांचं जाण दुःख देणार आहे. अजित पवारांचं मुख्यमंत्री होण्याच स्वप्न अधुर राहिलंय अजित पवारांचा वारसा चालवायला त्यांची मुलं अनुभवी नाहीत, त्यामुळे सुनेत्रा पवार यांना उपमुख्यमंत्री केलं पाहिजे असे मत रामदास आठवले यांनी व्यक्त केले. त्यांना उपमुख्यमंत्री केलं तर अजित पवारांचा वारसा नीट पुढे चालेल असे आठवले म्हणाले. दोन्ही राष्ट्रवादी एकत्र याव्यात ही अजित पवारांची इच्छा होती आता दादा गेल्यावर त्यांनी एकत्र यावं असेही आठवले म्हणाले. शरद पवार यांनी त्यांचे विचार बदलून एकत्र येऊन एन डी ए मध्ये यायला पाहिजे. त्यामुळं सुप्रिया सुळे यांना मंत्रिपद मिळेल आणि आम्हाला देखील चांगलं वाटेल असे रामदास आठवले म्हणाले. राज्यात सुनेत्रा पवार आणि केंद्रात सुप्रिया सुळे असे करायचं असेल तर शरद पवारांनी आता एकत्र येण्याची भूमिका घेतली पाहिजे असेही रामदास आठवले म्हणाले.

## बारामतीची पोटनिवडणूक लढवणार?

सुनेत्रा पवार या सध्या राज्यसभेच्या खासदार आहेत. तर अजित पवारांचे दोन्ही पुत्र, पार्थ आणि जय पवार हे सक्रिय राजकारणात नसले तरी पडद्यामागून पक्षसंघटनेमध्ये सक्रिय असल्याचं दिसतंय. असं असलं तरी या तिघांनाही राजकारणाचा तितकासा अनुभव नाही. अजित पवारांच्या निधनानंतर एक उपमुख्यमंत्रिपद सध्या रिक्त आहे. पुढच्या सहा महिन्यात बारामती विधानसभा पोटनिवडणूकही घ्यावी लागणार आहे. त्यामुळे पक्षाचं नेतृत्व करायचं असेल तर सुनेत्रा पवारांनी बारामतीची पोटनिवडणूक लढवावी आणि उपमुख्यमंत्रिपद स्वीकारावं अशी एक मागणी जोर धरताना दिसत आहे.

## राष्ट्रवादीच्या एकीकरणाची चर्चा

राष्ट्रवादीमध्ये फुट पडल्यानंतर प्रफुल पटेल, सुनील तटकरे, छगन भुजबळ, हसन मुश्रीफ, दिलीप वळसे पाटील, धनंजय मुंडे यांच्यासह अनेक बडे नेते अजित पवारांसोबत राहिले. आता दोन्ही राष्ट्रवादींच्या एकीकरणाची चर्चा सुरु असतानाच अजित पवारांचे अचानक निधन झालं. राष्ट्रवादीच्या एकीकरणासाठी स्वतः अजित पवार हे आग्रही होते असं म्हटलं जात आहे. शरद पवारांच्या वाढदिवसादिवशीच, म्हणजे १२ डिसेंबर रोजीच दोन्ही राष्ट्रवादींचे एकीकरण करून पवारसाहेबांना सरप्राईज देण्याची इच्छा अजित पवारांची होती, पण काही कारणामुळे ते शक्य झालं नसल्याचं वक्तव्य अंकुश काकडे यांनी केलं. त्यामुळे दोन्ही राष्ट्रवादीचे एकीकरण करून त्याचं नेतृत्व पुन्हा एकदा शरद पवारांच्या हाती देणं हा एक पर्याय असल्याची चर्चाही सुरू आहे.

## अर्थखाते कुणाकडे?

अजित पवार यांच्या निधनानंतर त्यांच्याकडे असलेल्या खात्यांची जबाबदारी कुणाकडे दिली जाणार याचा निर्णय होण्याची शक्यता आहे. अजित पवारांकडे असलेली खाती कुणाकडे द्यावीत याबाबत मुख्यमंत्री फडणवीसांना पत्र देण्यात येण्याची शक्यता आहे. अजित पवारांकडे अर्थ, क्रीडा आणि राज्य उत्पादन शुल्क खात्यांची जबाबदारी होती. ही तीनही खाती राष्ट्रवादीच्या वाट्याची असल्याने ती आपल्याकडेच राहावीत यासाठी प्रयत्नशील आहे. त्यामुळे ही खाती कोणत्या मंत्र्याकडे देण्यात यावीत यासाठी पत्र देण्यात येणार असल्याची माहिती विश्वसनीय सूत्रांनी दिली.

## अजितदादांसोबतचे नेते तयार होणार?

अजित पवारांसोबत गेलेले नेते हे महायुतीमध्ये मंत्री बनले. सत्तेसाठी हे नेते भाजपसोबत गेले, आणि त्यातील बऱ्याच जणांवर सुरू असलेल्या ईडीच्या कारवायाही थांबल्या. आता दोन्ही राष्ट्रवादी जर एकत्र आल्या आणि पुन्हा शरद पवार प्रमुख बनले तर त्याला अजितदादांसोबतच्या गेलेले नेते तयार होतील का असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.शरद पवार हे सध्या महाविकास आघाडीचे प्रमुख घटक आहेत. त्यांच्यासोबत जाणं, त्याचे नेतृत्व स्वीकारणे म्हणजे सत्तेतून बाजूला जावं लागेल. त्यामुळे राष्ट्रवादीतील बडे नेते ही भूमिका स्वीकारतील का हे पाहावं लागेल. दोन्ही राष्ट्रवादींचे एकीकरण झाले आणि शरद पवारांनी एनडीएसोबत जाण्याची भूमिका घेतली तर त्याला या नेत्यांचा विरोध नसेल. मात्र पवारांनी जर महाविकास आघाडीसोबत कायम राहायचं ठरवलं तर मात्र छगन भुजबळ, प्रफुल पटेल, सुनील तटकरे, हसन मुश्रीफ, धनंजय मुंडे यांच्यासह अनेक नेत्यांची पंचायतही होण्याची शक्यता आहे. यातील काही नेत्यांना त्यांच्यावरील कारवाया थांबवण्यासाठी भाजपमध्ये जाण्याशिवाय पर्याय नसेल असंही बोललं जातंय.

## भाजपची भूमिका काय असेल?

अजित पवारांच्या निधनानंतर राष्ट्रवादीच्या नेत्यांशी चर्चा करून पुढची भूमिका, पुढचं पाऊल टाकलं जाईल असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी या आधीच स्पष्ट केलं आहे. केंद्रात आणि राज्यात बळकट सत्ता असल्यामुळे अजित पवारांच्या राष्ट्रवादीची सूत्रं कुणाकडे जावीत हे ठरवण्यामध्ये भाजप निर्णायक भूमिका घेऊ शकते. भाजपच्या चाणाक्यांकडूनही तशा हालचालीही केल्या जाण्याची शक्यता आहे. आपल्याला सोईचं होईल, पुढील राजकारण सोपस्कर होईल, तशी भूमिका घेणाऱ्याच्या हाती राष्ट्रवादी पक्षाची सूत्रं राहतील यासाठी भाजपकडूनही प्रयत्न केला जाण्याची शक्यता आहे. पक्ष संघटनेवर एकहाती वर्चस्व असलेल्या अजित पवारांच्या निधनानंतर त्यांचा राजकीय वारसदार कोण असावा यासाठी पडद्यामागे जोरदार हालचाली सुरू असल्याचं चित्र आहे. त्याचं उत्तरही आपल्याला लवकरच मिळेल.

# जि.प. आणि पं.स.च्या निवडणुका दोन दिवस पुढे

## सात फेब्रुवारी मतदान तर नऊ रोजी मतमोजणी

✔ सोलापूर/प्रतिनिधी

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनामुळे राज्यात तीन दिवसांचा दुखवटा जाहीर करण्यात आल्यामुळे १२ जिल्हा परिषदा व त्यांतर्गतच्या १२५ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकांच्या उर्वरित टप्प्यांमध्ये बदल करण्यात आला आहे. ५ फेब्रुवारी ऐवजी आता ७ फेब्रुवारी रोजी मतदान तर ७ फेब्रुवारी ऐवजी ९ फेब्रुवारी २०२६ रोजी मतमोजणी होईल.

राज्य निवडणूक आयोगाने या जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांच्या निवडणुकांसाठी १३ जानेवारी रोजी निवडणूक कार्यक्रम जाहीर केला होता. त्यानुसार नामनिर्देशनपत्र दाखल करणे, नामनिर्देशनपत्र मागे घेणे, चिन्ह वाटप आणि निवडणूक लढविणाऱ्या अंतिम उमेदवारांची यादी प्रसिद्ध करणे आदी टप्प्यांची प्रक्रिया पूर्ण झाली आहे. त्यापुढील मतदान, मतमोजणी आणि निवडून आलेल्या सदस्यांची नावे राजपत्रात प्रसिद्ध करणे हे टप्पे शिल्लक आहेत.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे २८ जानेवारी रोजी अपघाती निधन झाल्यामुळे राज्य शासनाने राज्यात ३० जानेवारीपर्यंत दुखवटा जाहीर केला आहे. या कालावधीचा विचार करून जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांच्या निवडणुकांच्या कार्यक्रमातील उर्वरित टप्प्यांमध्ये बदल करण्यात आले आहेत. त्यानुसार संबंधित जिल्हाधिकारी सुधारित निवडणूक कार्यक्रमाची सूचना ३१ जानेवारी रोजी प्रसिद्ध करतील. आता ७ फेब्रुवारी रोजी ७.३० ते सायंकाळी ५.३० या वेळेत मतदान होईल. त्यामुळे जाहीर प्रचाराची समाप्ती ५ रोजी रात्री १० वाजता होईल.

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे




चाहुल !

कल्याण
788-35-159

मुंबई
699-47-188

# 'माझा प्रवास इथेच थांबतोय'



- अलविदा अजित पवारांचा शेवटचा संदेश...
- 'ती' ऑडिओ क्लीप ऐकून महाराष्ट्रवासियांच्या भावना आल्या दाटून!

✔ बारामती/प्रतिनिधी

दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या आकस्मित निधनानंतर अवघा महाराष्ट्र हळहळला आहे. दादांवर प्रेम करणारी जनता, त्यांचे चाहते, सहकारी, कुटुंबिय आणि ग्रामस्थ सर्वांच्याच भावना दाटून आल्या आहेत. बुधवारी अजितदादांच्या पार्शिवावर अंत्यसंस्कार पार पडले. अशातच अजितदादांच्या शेवटच्या संदेशाच्या रुपात त्यांच्याच आवाजातील 'एआय' तंत्रज्ञानाच्या मदतीनं बनवलेली एक ऑडिओ क्लीप सध्या सोशल मीडियावर व्हायरल झाली आहे. यात त्यांनी कार्यकर्त्यांना उद्देशून बोलताना 'माझा प्रवास इथेच थांबतोय', असं म्हटलं आहे. पण ही संपूर्ण क्लीप ऐकल्यानंतर तुमच्याही भावना दाटून येतील. नेमकं 'एआय' क्लिपमध्ये काय आहे? याबद्दलची ही माहिती

'एआय'च्या मदतीनं तयार करण्यात आलेल्या या ऑडिओ क्लीपमध्ये अजित पवारांच्या आवाजातील संदेश असा आहे. अरे बेट्यांनो इतक्या लवकर मी काय जात नसतो तुम्हाला सोडून हा. मलाबी अजित पवार म्हणतात. पण गड्यांनो नियतीचा खेळ बघा खरंच, आज माझा हा प्रवास इथेच थांबतोय. मी नेहमी म्हणायचो राजकारण आपल्या जागीए, पण काम महत्वाचं. लोकांनी मला कामाचा माणूस म्हटलं तीच माझ्या आयुष्यातली सर्वात मोठी कमाई होती. आज निरोप घेताना मन खूप जडए, पण एक समाधान आहे की, शेवटच्या श्वासापर्यंत मी तुमच्यासाठीच धावत होतो. मी तुम्हाला शब्द दिला होता जोपर्यंत माझे हातपाय चालतात तोपर्यंत तुमचं भलं करण्यासाठी मी झटत राहील. नियती बघा कशी असते आज माझ्या हक्काच्या बारामतीच्या मातीत तुमच्या सेवेसाठी येत असतानाच माझे हातपाय कायमचे विसावले. पण मला अभिमान वाटतो की रिकाम्या हाताने नाही तर तुमच्या कामाची फाईल छातीशी धरूनच या जगाचा निरोप घेतोय. शेवटच्या क्षणी ही माझ्या डोळ्यासमोर फक्त तुमचाच चेहरा होता.

माझा स्वभाव थोडा रोखठोक होता. कधी कुणावर ओरडलो असेल, कुणाचे मन दुखावले असेल. पण माझ्या त्या रागामागे फक्त एकच तडफड होती की माझ्या सामान्य माणसाचे काम झाले पाहिजे. सत्तेसाठी नाही तर तुमच्या हक्कासाठी मी नेहमीच दादा म्हणून उभा राहिलो. आता मी निरोप घेतोय. पण महाराष्ट्र थांबता काम नये. माझी ही जबाबदारी आता मी तुमच्यावर सोपवतो. राजकारण करा पण विकासाची गती थांबून देऊ नका. जाता जाता माझ्या शैलीत डोळे पूसून शेवटचं सांगतो आता रडत बसू नका, उठा आणि कामाला लागा. माझा महाराष्ट्र आपल्याला अजून खूप पुढे न्यायचा आहे. तुमचाच कामचा माणूस अजितदादा पवार!